महा वितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

# जाहीर सूचना

महा.राज्य,वि.वि.कं.मर्या अचलपूर विभागातंर्गत सत्र २०२२-२३ करीता ऑनलाईन पध्दतीने खालील व्यवसायाकरीता शिकाऊ उमेदवारांची प्रशिक्षणाकरीता निवड करावयाची आहे.

**विजतंत्री (Electrician)-३२, तारतंत्री (Lineman)-३० व कोपा-पासा - ११ एकूण-७३**

**शैक्षणीक अर्हता :-** १) म.राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ १०+२ बंधामधील माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा कींवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक, २) महाराष्ट राज्य माध्यमिक परीक्षा मधील बेस्ट ५ चे गुण ग्राह्य समजले जाणार नाहीत. ३) राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद नवी दिल्ली मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधुन विजतंत्री, तारतंत्री व कोपा-पासा व्यवसायात उत्तीर्ण झालेला असावा अथवा महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास मंडळ MSBTE या बोर्डाचा डिप्लोमामार्फत इलेक्ट्रिशन दोन वर्ष अभ्यासक्रम समकक्ष असल्यामुळे विजतंत्री व तारतंत्री शिकाऊ उमेदवार सुध्दा अर्ज करण्याकरीता पात्र समजण्यात येतील.

**अटी व शर्ती :-** (१) उमेदवाराचे वय १८ वर्ष पुर्ण असणे आवश्यक व कमाल ३० वर्ष असावे तसेच राखीव उमेदवाराकरीता वयाची अट ०५ वर्ष शिथिलक्षम राहील (२) सदर उमेदवार हा अमरावती जिल्ह्यातील रहिवासी असावा (आधारकार्ड मधील पत्त्यानुसार) (३) ऑनलाईन अर्ज करतांना उमेदवाराने ई-मेल आयडी, भ्रमणध्वनी क्रमांक अचुक नमुद करावा (४) प्रशिक्षणाचा कालावधी १ वर्षे राहिल (५) ईच्छुक व पात्र उमेदवारांनी **www.apprenticeshipindia.org** या संकेत स्थळावर ऑनलाईन अर्ज जाहिरातीच्या दिनांकापासुन ते १५.०१.२०२३ पर्यंत या कार्यालयाचा आस्थापना क्रमांक **E10162701548** यावर योग्य व पुरीपुर्ण माहितीसह सादर करणे आवश्यक आहे. विहित मुदतीनंतर सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही (६) ऑनलाईन नोंदणी अर्जाची प्रत शैक्षणिक मुळ कागदपत्रे व आधारकार्ड कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं. मर्या., विभागीय कार्यालय, सिव्हिल लाईन, परतवाडा ता. अचलपूर जि. अमरावती येथे दि. १५.०१.२०२३ ते दि. २५.०१.२०२३ पर्यंत सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.३० पर्यंत अर्ज स्वतः सादर करने आवश्यक. (७) शिकाऊ उमेदवार यांची निवड माध्यमिक शालांत परीक्षेचे ५०% गुण व आय. टी. आय. चे ५०% गुण असे एकुण गुण विचारात घेवुन गुणवत्ता यादी तयार करुन शिकाऊ उमेदवाराची निवड करण्यात येईल (८) जाहिरातीमध्ये अंशतः बदल किंवा संपुर्ण जाहिरात रद्द करण्याचे अधिकार कंपनी राखुन ठेवीत आहे.

**पी.आर.ओ. नं.९७ कार्यकारी अभियंता म.रा.वि.वि.कं,मर्या., अचलपूर विभाग**